# प्रेसनोट

दि.१६/११/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | मिरजगांव पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.७६/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम १३(१), (क)(ड) सह १३(२) व भा.दं.वि.क.४६८, ४७१, ३४ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)रमेश गोविंद गोलेकर, वय-६३ वर्ष, सेवानिवृत्त (तत्कालीन पद सहायक वन संरक्षक रोहयो व अतिक्रमण निर्मुलन श्रीगोंदा, रा.खर्डा, ता.जामखेड, जि.अहमदनगर<br>२)शंकरराव वृषीकेत पाटील,वय-४४ वर्ष,तत्कालीन वन परिक्षेत्र अधिकारी,वर्ग-२,कर्जत,जि.अहमदनगर.<br>३)अनिल बापुराव खराडे, तत्कालीन वनपाल, वर्ग-३, बिटकेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर<br>४)ज्ञानदेव तुळशीराम चांडे, तत्कालीन वनरक्षक, वर्ग-३, बिटकेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर |
| शासकीय योजनेत अपहार केलेली रक्कम | --- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, महाराष्ट्र शासनाकडून सन २०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवार अभियान झालेल्या कामांची उघड चौकशी करणे बाबतचे आदेश लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना सप्टेंबर २०२१ मध्ये प्राप्त झाले होते. त्यामध्ये मौजे बिटकेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर येथील गट नं.१५१ मधील खोल सलग समतल चर खोदण्याचे काम दि.१८/५/२०१५ ते दि.१३/७/२०१५ या कालावधी मध्ये वनविभागाच्या मार्फत करण्यात आले. मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई व मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे आदेशानुसार उपरोक्त कामाची उघड चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर घटकामार्फत दि.४/९/२०२१ पासुन सुरु करण्यात आली.<br>सदर कामाच्या चौकशी दरम्यान प्रथमदर्शनी आरोपी नं.१)रमेश गोविंद गोलेकर, सेवानिवृत्त (तत्कालीन पद सहायक वन संरक्षक रोहियो व अतिक्रमण निर्मुलन श्रीगोंदा २)शंकरराव वृषीकेत पाटील,वय-४४ वर्ष,तत्कालीन वन परिक्षेत्र अधिकारी,वर्ग-२,कर्जत, जि.अहमदनगर ३)अनिल बापुराव खराडे, तत्कालीन वनपाल, वर्ग-३, बिटकेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर ४)ज्ञानदेव तुळशीराम चांडे, तत्कालीन वनरक्षक, वर्ग-३, बिटकेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर यांनी मौजे बिटकेवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर येथील गट नं.१५१ मधील खोल सलग समतल चर खोदण्याचे काम करत असतांना पदाचा दुरुपयोग करुन, संगनमताने खोटे व बनावट दस्तऐवज तयार करुन भ्रष्टाचार केल्याचे निष्पन्न झाले म्हणून त्यांच्याविरुध्द मिरजगांव पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गु.र.नं.७६/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम १३(१), (क)(ड) सह १३(२) व भा.दं.वि.क.४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद गोर्डे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर हे करीत आहेत. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल ऑनलाईन तक्रार :- acbwebmail@mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक :- ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर